क्र·सी/कार्या-३/जमिन-२ब/४१२/८८

अपर जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
मुंबई उपनगर जिल्हा, दूसरा माळा
जुने जकात घर, मुंबई – ४०० ०२३·
दिनांक :- २०/२/१९८९

वाचले

१) श्रीमती लुईजा फर्नांडीस, सेक्रेटरी, कास्मा कॉलनी रहिवाशी संघाचा दिनांक ३०-४-१९८६ चा अर्ज
२) अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण) मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्र· सीएस-१/कक्ष-३/३५४/सीआर-६०८ दिनांक २३-४-१९८७
३) कास्मा कॉलनी रहीवाशी असोसिएशनचे दिनांक ७-१२-१९८८ चे हमीपत्र

आ दे श

मौजे वांद्रे येथील नगर भूमापन क्रमांक ९११ या शासकिय जमिनीतून कास्मा कॉलनी रहिवाशी असोसिएशनला खालील अटींवर पाण्याचे पाईप व विजेचे केबल टाकण्यास अनुमती देण्यांत येत आहे·

१) या जमिनतीतून पूर्वीच्या केबल अथवा पाण्याचे नळ गेले असतील तर त्यांचे नुकसान होता कामा नये झाल्यास त्याची भरपाई वरील रहिवासी असोसिएशनला करून द्यावी लागेल·
२) जेव्हा याजमिनीची शासनास गरज असेल तेव्हा विजेचे केबल व पाण्याचे पाईप असोसिएशनने स्वत:चे खर्चाने काढून घ्यावयाचे आहेत व त्यासाठी येणाऱ्या खर्चाचा दावा असोसिएशन करू शकणार नाही· तसेच नुकसान भरपाई मागणार नाही व पर्यायी जागेची मागणी करणार नाही·
३) पाण्याच्या पाईप व विजेच्या केबल खालील जमिनीचा शासन ठरविल तो भाडेपट्टा अथवा शासन ठरविल ती कब्जाहक्काची किंमत असोसिएशनला द्यावी लागेल·
४) विजेचे केबल व पाण्याची पाईप टाकण्याची परवानगी रद्द करण्याचे अधिकार अपर जिल्हाधिकारी यांचे राहतील
५) वरील कोणत्याही अटींचा भंग झाल्यास परवानगी रद्द केली जाईल व असोसिएशन विरूद्ध कायदेशीर कार्यवाही केली जाईल·

२०/२

अपर जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा करिता,

प्रति
श्रीमती लुईजा फर्नांडिस, सेक्रेटरी
कास्मा कॉलनी रहीवाशी असोसिएशन
सेनाॅय प्रॉपर्टी माऊंट मेरि रोड
बांद्रा (प·) मुंबई – ४०० ०५०

प्रत तहसिलदार अंधेरी यांजकडे माहितीसाठी रवाना